## MAHARASHTRA ACT No. XVII OF 1978

## THE BOMBAY MUNICIPAL CORPORATION (REVISION OF ELECTION ROLL AND FURTHER EXTENSION OF TERM) ACT, 1978

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २९ जुलै १९७८ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XVII OF 1978

## AN ACT TO PROVIDE FOR FURTHER REVISION OF THE MUNICIPAL ELECTION ROLL AND EXTENSION OF THE TERM OF OFFICE OF THE COUNCILLORS OF THE MUNICIPAL CORPORATION OF GREATER BOMBAY.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २९ जुलै १९७८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

### सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७

**नगरपालिकांच्या मतदार याद्यांत आणखी सुधारणा करण्याकरिता आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पालिकासदस्यांचा पदावधी आणखी वाढविण्याकरता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७७ याअन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पालिका सदस्यांचा पदावधी, ३१ मे १९७८ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंतच्या मुदतीपर्यंत आणखी वाढवण्यात आला होता, आणि पालिकासदस्यांचा वाढवलेला पदावधी संपण्यापूर्वी किंवा त्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, महानगरपालिकेची पुनर्रचना करण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांकडून व्यवस्था केली जाणार होती ;

**आणि ज्याअर्थी,** नगरपालिकांच्या मतदार याद्या अधिक अद्यावत असाव्यात म्हणून आणि शाळा व महाविद्यालये यांच्या परीक्षा आणि पावसाळा यांमुळे आणि त्यावेळी वॉर्डांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यामुळे मतदार, उमेदवार व सर्वसाधारण जनता यांची होणारी गैरसोय व अडचण दूर करण्यासाठी आतापर्यंत सार्वत्रिक निवडणुका घेणे शक्य झालेले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** नगरपालिकेच्या मतदार यादीत आणखी सुधारणा करण्यासाठी आणि मतदार यादी अशा प्रकारे सुधारली जाईपर्यंत सार्वत्रिक निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी आणि, अशाप्रकारे निवडणुका लांबणीवर टाकण्याच्या परिणामी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमान पालिका सदस्यांचा पदावधी, १५ नोव्हेंबर १९७८ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत आणखी वाढवण्यासाठी तरतूद करणे आणि इतर संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (मतदार यादीत सुधारणा करणे आणि पदावधी आणखी वाढवणे) अधिनियम, १९७८ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो दिनांक ३१ मे १९७८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**पालिका सदस्यांचा पदावधी आणखी वाढवणे.**

(सन १९७७ चा महा. अधिनियम क्रमांक ४८.)

२. (१) महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियम" असा करण्यात आला आहे) आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) यात काहीही अंतर्भूत असले तरी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पालिकासदस्यांचा जो पदावधी, दिनांक ३१ मे १९७८ नंतर समाप्त झाला असता, तो समाप्त झालेला नाही आणि वाढवण्यात आलेला आहे असे मानण्यात येईल आणि याद्वारे तो, जेव्हा हे पालिकासदस्य मुख्य अधिनियमाच्या कलम ७ याच्या प्रयोजनांसाठी, निवृत्त होतील अशा वेळेपर्यंत, म्हणजेच १५ नोव्हेंबर १९७८ रोजी दुपारी १२–०० वाजेपर्यंत आणखी वाढवण्यात आलेला आहे असे मानण्यात येईल.

(२) मुख्य अधिनियमाची कलमे ९ आणि २२ यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या कलम ४ याच्या उपबंधास अधीन राहून, दिनांक १ जून १९७८ ला प्रारंभ होणाऱ्या व दिनांक १५ नोव्हेंबर १९७८ रोजी दुपारी १२–०० वाजता संपणाऱ्या कालावधीत सार्वत्रिक निवडणुका आणि कोणत्याही पालिकासदस्याच्या पदासाठी पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही ;

मात्र, या सार्वत्रिक निवडणुका नवनिर्वाचित पालिकासदस्यांना ते, ज्यांचे उत्तराधिकारी होणार आहेत, अशा पालिकासदस्यांच्या निवृत्तीच्या दिवशी, पद धारण करता यावे म्हणून उक्त कालावधीच्या शेवटी योग्य त्या वेळी घेण्यात येतील.

**ज्यांचा पदावधी आणखी वाढवण्यात आलेला आहे अशा पालिका सदस्यांच्या शक्ती आणि विवक्षित कृतींचे वैधकरण.**

३. ज्यांचा पदावधी कलम २ अन्वये वाढवण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल, किंवा आणखी वाढवण्यात आला असेल असे सर्व पालिकासदस्य, वाढवण्यात आलेल्या संपूर्ण कालावधीत-सुद्धा, असे पालिकासदस्य म्हणून, सर्व शक्तींचा वापर करण्यास, सर्व कर्तव्यांचे पालन करण्यास व सर्व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व सक्षम असतील, उपरोक्त कालावधीमध्ये त्यांच्यापैकी कोणीही किंवा नगरपालिका प्राधिकरणे किंवा संस्था यांच्यापैकी कोणीही केलेली कोणतीही कृति, पदावधी योग्य वेळी वाढवण्यात आलेला नव्हता किंवा अन्यथा योग्य रीतीने वाढवण्यात आलेला नव्हता, किंवा वाढवण्यात आलेल्या कालावधीमध्ये महानगरपालिकेला अथवा तिची प्राधिकरणे किंवा संस्था यांना किंवा पालिकासदस्यांपैकी कोणासही महानगरपालिकेच्या, प्राधिकरणाच्या, संस्थेच्या किंवा यथास्थिती पालिकासदस्याच्या सर्व किंवा कोणत्याही शक्तींचा वापर करता येत नव्हता किंवा सर्व किंवा कोणत्याही कर्तव्यांचे पालन करता येत नव्हते किंवा सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडता येत नव्हती, केवळ याच कारणावरून अवैध असणार नाही किंवा त्या कृतीस न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.

**नगरपालिकांच्या मतदार यादीची नव्याने सुधारणा करणे.**

४. (१) मुख्य अधिनियमाचे कलम १९, पोट-कलम (१) खंड (ब) याच्या परिच्छेद (सहा) याअन्वये, दिनांक २३ मार्च १९७८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या वॉर्डांच्या अंतिम मतदार याद्या, त्यांच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, त्यात नावे समाविष्ट करण्यासाठी व नोंदी दुरुस्त करण्यासाठी, अर्ज मागवण्याच्या प्रयोजनासाठी, उक्त खंड (ब) याच्या परिच्छेद (एक) याअन्वये वॉर्डांच्या मतदार याद्यांचा मसुदा म्हणून पुन्हा प्रसिध्द करण्यात येतील.

(२) मुख्य अधिनियमात किंवा त्याअन्वये काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या वॉर्डांच्या मतदार याद्यांच्या बाबतीत उक्त खंड (ब) चा परिच्छेद (एक) याच्या प्रयोजनांसाठी संबंधित तारीख १ जून १९७८ ही असेल आणि उक्त खंड (ब) याच्या परिच्छेद (चार) आणि (सहा) यात निर्देशिलेला पंचेचाळीस दिवसांचा कालावधी, वॉर्डांच्या मतदार याद्यांना अंतिम स्वरूप देण्याच्या प्रयोजनासाठी, सदतीस दिवस इतका कमी करण्यात आलेला असेल.

(३) उक्त खंड (ब) मध्ये घालून देण्यात आलेली पुढील कार्यपद्धती अनुसरल्यानंतर व आवश्यक ते बदल करण्यात आल्यानंतर, उक्त खंड (ब) च्या परिच्छेद (सहा) अन्वये वॉर्डांच्या अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येतील. अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या वॉर्डांच्या अंतिम याद्या या, आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनासाठी सर्व बाबतीत नगरपालिका निवडणूक याद्या असल्याचे मानण्यात येईल.

(४) मुख्य अधिनियमाचे कलम ५, पोट-कलम (१-अ) व कलम १९, पोट-कलम (१) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शासकीय अधिसूचना, नगरविकास व आरोग्य विभाग, क्रमांक बीएमसी. ११७७/३०९४-युडी-३, दिनांक ३० ऑगस्ट १९७७ ही, रद्द करण्यात आल्याचे मानण्यात येईल व राज्य शासन, बृहन्मुंबईतील अनुसूचित जातींमधील व्यक्तींची लोकसंख्या विचारात घेऊन आणि बृहन्मुंबईच्या निरनिराळ्या भागांमध्ये राखीव जागांचे वाटप करण्याची आवश्यकता विचारात घेऊन, उपलब्ध असलेल्या जागांच्या एकूण संख्येमधून अनुसूचित जातींच्या व्यक्तींसाठी जागांची संख्या राखून ठेवण्याबाबत तरतूद करण्यासाठी व अशा जागा ज्या वॉर्डमध्ये राखून ठेवण्यात येतील असे वॉर्ड विनिर्दिष्ट करण्यासाठी नवीन अधिसूचना काढील.

(५) वॉर्डांच्या अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर व पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली नवीन अधिसूचना काढण्यात आल्यानंतर, महानगरपालिका आयुक्त, सार्वत्रिक निवडणुकांच्या विविध टप्प्यांच्या तारखा निश्चित करील व मुख्य अधिनियमाचे कलम २२ आणि इतर संबंधित उपबंध यांअन्वये निवडणुका घेण्यासाठी इतर आवश्यक ती कार्यवाही करील.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १९, पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १९ ची सुधारणा.

"(१-अ) (अ) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) कोणत्याही वॉर्डाच्या अंतिम मतदार यादीत जिचे नाव समाविष्ट करण्यात आलेले नसेल अशी कोणतीही व्यक्ती आपल्या नावाचा मतदार यादीत समावेश करण्यास इच्छुक असेल तर, किंवा

(दोन) कोणत्याही वॉर्डाच्या अंतिम मतदार यादीत जिचे नाव समाविष्ट करण्यात आलेले असेल अशी कोणतीही व्यक्ती तिच्यामधून आपले नाव वगळून इतर कोणत्याही वॉर्डाच्या अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यास इच्छुक असेल तर,—

तिला, या पोट-कलमाच्या खंड (ड) च्या अधीन राहून, कोणत्याही वेळी, आपल्या नावाचा विनिर्दिष्ट वॉर्डाच्या अंतिम मतदार यादीत समावेश करण्यासाठी, याबाबतीत पदनिर्देशित केलेल्या राज्य शासनाच्या अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. अशा अर्जासोबत दहा पैशांचे शुल्क देण्यात येईल, ते कोणत्याही प्रकरणी परत करण्यात येणार नाही.

(ब) असा अर्ज मिळाल्यावर, पदनिर्देशित अधिकारी, अशा रीतीने मिळालेल्या अर्जाचा तपशील आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावील व असा तपशील लावल्याच्या तारखेपासून एक आठवडा संपल्यानंतर अर्जदारास या कलमान्वये कोणत्याही वॉर्डाच्या अंतिम मतदार यादीत नाव नोंदणी करण्याचा हक्क आहे याबद्दल पदनिर्देशित अधिकाऱ्याची खात्री होईल तर, तो, त्या यादीमध्ये त्याच्या नावाची नोंदणी करण्याबाबत निदेश देईल व त्यानंतर अंतिम मतदार यादीत त्याप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली असेल. अर्जदाराचे नाव इतर कोणत्याही वॉर्डाच्या अंतिम यादीत नोंदण्यात आले असेल तर, पदनिर्देशित अधिकारी त्या मतदार यादीतून अर्जदाराचे नाव काढून टाकील. पदनिर्देशित अधिकाऱ्याची अशा प्रकारे खात्री झालेली नसेल त्याबाबतीत, तो, संबंधित व्यक्तीचा अर्ज नाकारण्यापूर्वी, त्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल ;

(क) या पोट-कलमान्वये पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशाविरुद्धचे अपील, राज्य शासनाने अपील अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या त्याच्या अधिकाऱ्याकडे दाखल करण्यात येईल; व या पोट-कलमान्वये केलेल्या कोणत्याही अपीलाच्या बाबतीत पोट-कलम (१), खंड (ब) याच्या परिच्छेद (पाच) चे उपबंध योग्य त्या फेरफारांसह लागू होतील ;

(ड) कोणत्याही वॉर्डातील कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकांच्या किंवा पोट-निवडणुकीच्या नामनिर्देशन-पत्रांसाठी असलेली शेवटची तारीख संपल्यानंतर व ती निवडणूक पूर्ण होण्यापूर्वी, या पोट-कलमान्वये त्या वॉर्डाच्या अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत कोणतेही निदेश देण्यात येणार नाहीत."

विद्यमान पालिका सदस्यांचा पदावधी वाढवण्याचे व त्यांच्या निवृत्तीची तारीख निश्चित करण्याचे परिणाम.

६. कलम २, पोट-कलम (१) अन्वये पालिकासदस्यांच्या पदावधीत वाढ केल्यामुळे व त्यांच्या बाबतीत निवृत्तीची तारीख निश्चित केल्यामुळे, पुढील परिणाम होतील व मुख्य अधिनियमाच्या उपबंधांमध्ये, या कलमात यानंतर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबींशी ते जेथवर संबंधित आहेत तेथवर, त्यानुसार सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :—

(एक) कलम ४, पोट-कलम (५) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकी-मध्ये जे निवडून आले आहेत असे सर्व पालिकासदस्य व त्यानंतर नैमित्तिक रिक्त पदे भरण्या-साठी जे निवडून आले आहेत असे सर्व पालिकासदस्य, मुख्य अधिनियमाच्या कलम ७ व ९ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १ एप्रिल १९८३ या दिवशी दुपारी १२ वाजता पदावरून निवृत्त होतील.

(दोन) पालिकासदस्य, महानगरपालिकेची १ एप्रिल १९७९ रोजी सुरू होणाऱ्या शासकीय वर्षातील पहिली सभा होईपर्यंत, अशा सार्वत्रिक निवडणुकांनंतर होणाऱ्या त्यांच्या पहिल्या सभेत, त्यांच्या सदस्यांपैकी एकाची महापौर म्हणून नियुक्ती करतील.

(तीन) स्थायी समिती, सुधार समिती, मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती, शिक्षण समिती आणि इतर समित्या यांच्या सदस्यांची नियुक्ती अशा सार्वत्रिक निवडणुकांनंतरच्या पालिकासदस्यांच्या पहिल्या सभेच्या वेळी, किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, करण्यात येईल.

(चार) खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेली स्थायी समिती, सुधार समिती मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती आणि शिक्षण समिती यांपैकी प्रत्येक समिती आपल्या, पहिल्या सभेच्या वेळी आपल्यामधून एकाची, एप्रिल १९७९ मध्ये अशा समितीची पहिली सभा होईपर्यंत आपला सभापती म्हणून नियुक्ती करतील.

(पाच) खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या स्थायी समितीचे व सुधार समितीचे निम्मे सदस्य १ एप्रिल १९७९ रोजी दुपारी १२ वाजता निवृत्त होतील. अशा रीतीने जे सदस्य निवृत्त होतील त्या सर्वांची निवड १ मार्च १९७९ पूर्वीची असेल, अशा वेळी व संबंधित समितीचा सभापती ठरवील अशा रीतीने करण्यात येईल.

(सहा) खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समितीचे निम्मे सदस्य १ एप्रिल १९८० रोजी निवृत्त होतील. अशा रीतीने जे सदस्य निवृत्त होतील त्या सर्वांची निवड १ मार्च १९७९ पूर्वीची असेल, अशा वेळी व संबंधित समितीचा सभापती ठरवील अशा रीतीने करण्यात येईल.

(सात) शिक्षण समितीच्या, खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या, पालिकासदस्य असलेल्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य आणि इतर सदस्यांपैकी निम्मे सदस्य १ एप्रिल १९७९ रोजी दुपारी १२ वाजता निवृत्त होतील. अशा रीतीने जे सदस्य निवृत्त होतील त्या सर्वांची निवड १ मार्च १९७९ पूर्वीची असेल अशा वेळी व त्या समितीचा सभापती ठरवील अशा रीतीने करण्यात येईल.

मुख्य अधिनियम युक्त करणे.

७. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल ते खेरीज करून मुख्य अधिनियमाचे उपबंध, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीच्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीच्या बाबतीत **योग्य त्या फरकारांसह** लागू होतील.

अडचणी दूर करणे.

८. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या बाबींच्या बाबतीत मुख्य अधि-नियमाची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उपस्थित होईल तर, राज्य शासनास, आदेशा-द्वारे, प्रसंगपरत्वे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक असल्याचे दिसून येईल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

(यथार्थ अनुवाद)

**प्र. शं. कानिटकर,**

**भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई